वर्ष : ०६ | अंक: १४ | मुंबई, मंगळवार २५ फेब्रुवारी २०२० ते सोमवार २ मार्च २०२० | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 राज्यातील पालिका निवडणुकीच्या रिंगणात 'आप'ही

3 → आरक्षणाची रणभूमी

सरपंच निवडीचा अध्यादेश राज्यपालांनी फेटाळला ← 4




## अखेर शेतकरी कर्जमाफीची पहिली यादी जाहीर

**मुंबई - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला शेतकरी कर्जमाफीसंदर्भात मोठी घोषणा केली होती. शेतकऱ्याला कर्जमुक्त करण्याचे सरकारचे प्रयत्न असून, पहिली यादी २४ फेब्रुवारीला जाहीर होणार असल्याची घोषणा केली होती. अधिवेशनाला सुरूवात झाल्यानंतर काही तासात शेतकरी कर्जमाफीची पहिली यादी सरकारकडून जाहीर करण्यात आली आहे.**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शेतकरी कर्जमाफी योजनेबद्दल रविवारी झालेल्या पत्रकार परिषदेत महत्त्वाची माहिती दिली होती. 'महाविकास आघाडीचं सरकार विरोधकांना नाही, तर जनतेसाठी बांधिल आहे. मात्र, सरकार स्थिर झालं आहे. काम करत आहे यामुळे विरोधकांना पोटदुखी होत आहे. महाविकास आघाडीनं शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचं आश्वासन दिलं होतं. त्याची वचनपूर्ती उद्या होत आहे. शेतकरी कर्जमाफीची पहिली यादी उद्या जाहीर होईल. तीन महिन्या या योजनेची प्रक्रिया पूर्ण होईल. उद्याची यादी शेवटची नसेल. टप्प्याटप्प्यानं याद्या जाहीर केल्या जातील. सरकारनं केलेल्या नियोजनाप्रमाणे सुरूवातीला प्रत्येक जिल्ह्यातील दोन गावांचा यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. एप्रिल अखेरपर्यंत ही योजना पूर्ण होईल,' असं ठाकरे यांनी सांगितलं होतं.

### पहिल्या यादित १५ हजार लाभार्थ्यांची नाव

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेची पहिली यादी जाहीर केली. विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरूवात झाल्यानंतर राज्य सरकारकडून पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. ही यादी जाहीर करताना सरकारनं प्रत्येक जिल्ह्यातील दोन गावांचा समावेश केलेला असून, पहिल्या यादीत ६८ गावातील १५ हजार ३५८ लाभार्थ्यांची नावं आहेत. राज्य सरकारनं कर्जमाफी योजनेची अमलबजावणी करण्यापूर्वी ३४ लाख ८३ हजार ९०८ खात्यांची माहिती संग्रहित केली होती. कर्जमाफीनंतर शेतकऱ्यांना तसं प्रमाणपत्र दिलं जाणार आहे. जिल्हा पातळीवर कर्जमाफीच्या अमलबजावणीचं काम सुरू झालं असून सरकारनं कर्जमाफीसाठी पुरवणी मागणी सभागृहात पटलावर ठेवली आहे. यावर २७ फेब्रुवारी आणि २ मार्च रोजी चर्चा होणार आहे.

एम्.के.घारे ज्वेलर्स
नातं सोन्यापलीकडचं......१९३३ पासून



सोन्यावर आपला विश्वास,
सोन्यासोबत आपलं नातं खास

परळ 022 2412 4749 | कांदिवली 022 2863 1255 | गोरेगाव 022 2873 7788 | विरार 0250 250 4688 | भांडुप 022 2594 5666
बोरीवली 022 2848 1159 | मिरारोड 022 2810 6101 | डोंबिवली 0251 243 0072 | नालासोपारा 0250 243 7420 | मालाड 0250 28800712

## हेडफोन लावून रिक्षा चालवणाऱ्या रिक्षाचालकांचे हेडफोन जाळले

### मिरारोड वाहतुक पोलिसांची धडक कारवाई



मिरा रोड रेल्वे स्टेशनच्या हद्दीत वाहतुक विभागाने अतिशय चांगली कामगिरी केली. यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. पोलीसांनी हेडफोन लावून सतत बोलणाऱ्या चालकांवर कारवाई करुन ४०० ते ५०० हेडफोन भर रस्त्यात जाळून टाकले. वाहन चालवताना मोबाईल फोनवर बोलताना आढळल्यास पोलीस कारवाई करतात त्यामुळे वाहनचालक व प्रवासी यांच्यामध्ये वाद होत होते. रिक्षाचालक नेहमी हेडफोन लावून कोणाशी तरी बोलत असतात त्यामुळे प्रवाशाला कुठे उतरायचे आहे याकडे दुलर्क्ष करुन भलत्याच ठिकाणी घेऊन जातात. व यामुळे प्रवाशाची गैरसोय होते. यासाठी बऱ्याच प्रवाशांनी यासंदर्भात वाहतुक पोलिसांकडे तक्रार केली होती. शेवटी मिरारोड पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार कोळकर यांनी जितके रिक्षाचालक कानात हेडफोन लावून बोलत होते त्यांचे हेडफोन जप्त करुन भरचौकात जाळून टाकले. अशा या कृत्याला नागरिकांचे मोठया प्रमाणावर समर्थन मिळत आहे.

## १५ वर्षानंतर अंडरवर्ल्ड डॉन रवी पुजारी अखेर भारतात

**बंगळुरू – अंडरवर्ल्ड डॉन रवी पुजारीला पुन्हा एकदा सेनेगलमध्ये अटक करण्यात आली आहे. स्थानिक यंत्रणांच्या मदतीने रॉ या भारतीय गुप्तचर संस्थेचे अधिकारी आणि कर्नाटक पोलिसांच्या पथकानं संयुक्तपणे केलेल्या कारवाईत रवी पुजारीला बेड्या ठोकण्यात आल्यात. त्यानंतर रवी पुजारीला भारतात आणण्यास भारतीय तपास यंत्रणांना यश आलं आहे.**

पुजारी याला कर्नाटक येथील एका गुन्ह्यात ही कारवाई करण्यात आली आहे. सोनेगलमधून त्याला सकाळी नवी दिल्लीत आणण्यात आलं आणि तेथून थेट बंगळुरुला नेण्यात आलं. त्याला सकाळी ११ वाजता कोर्टात हजर केलं जाणार आहे. RAW च्या मदतीने कर्नाटक पोलिसांच्या विशेष अधिकाऱ्यांनी त्याला पश्चिम आफ्रिकेतल्या सेनेगल इथे अटक केलं होतं. रवी पुजारी हा भारताचा वॉन्टेड आरोपी आहे. त्याच्या विरोधात मुंबई, कर्नाटकसह अनेक राज्यात जवळपास २०० गुन्हे दाखल आहेत. रवी पुजारीला पकडण्यासाठी रॉचे अधिकारी आणि कर्नाटक पोलीस सेनेगलमध्ये गेले होते. शनिवारपासून त्यांच्या प्रत्यापर्णाची तयारी सुरू होती. ती पूर्ण झाल्यानंतर त्याला भारतात आणण्यात आलं



आहे. रवी पुजारीला भारतात आणण्यासाठी सर्व कागदपत्रांची पूर्तता अधिकाऱ्यांनी केली आणि त्याला भारतात आण्याचा मार्ग मोकळा झाला. तब्बल १५ वर्षानंतर त्याला भारतात आणण्यात तपास यंत्रणांना यश आलंय.

### अनेक गुन्ह्यांची नोंद

पुजारीवर कर्नाटक, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये हत्या, हत्येचा प्रयत्न, खंडणी आणि अन्य अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. कर्नाटकात बेंगळुरूमध्ये ३९, मंगळूरमध्ये ३६, उडुपीमध्ये ११ तर म्हैसूर, हुबळी-धारवाड, कोलार आणि शिवमोगामध्ये प्रत्येकी एक गुन्हा पुजारीविरुद्ध दाखल आहे. तर महाराष्ट्र मुंबई पोलिसांच्या रेकॉर्डमध्ये त्याच्या विरूद्ध ४९ गुन्ह्यांची नोंद आहे. गुजरातमध्ये खंडणी प्रकरणी त्याच्याविरूद्ध ७५ गुन्हे नोंद आहेत.

## CAA : दिल्लीत हिसाचाराचा उद्रेक



### आंदोलकांच्या हल्ल्यात पोलिसाचा मृत्यू

**नवी दिल्ली - ईशान्य दिल्लीत जाफराबाद येथे सुधारित नागरिकत्व कायद्या(सीएए) व एनआरसीच्या मुद्यावरून सोमवारी पुन्हा एकदा हिंसचार उफळला. सोमवारी दुपारी या कायद्याचे समर्थक आणि विरोधक हे पुन्हा एकदा समोरासमोर आले. यावेळी तुफान दगडफेक झाली. यामध्ये एका पोलीस शिपायाचा मृत्यू झाला. याशिवाय एका पोलीस अधिकाऱ्यासही गंभीर दुखापत झाल्याची माहिती समोर आली आहे.**

घटनास्थळीची परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी सुरूवातीस अश्रुधाराचा नळकांड्या देखील फोडल्या.

उर्वरित पृष्ठ 2 वर

## सोशल राईटस् फाऊंडेशन संघटनेच्या वतीने 'मी एक विद्यार्थी, माझे सामर्थ्य किती?'

### या शिर्षकाद्वारे पनवेल शहरात विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित



पनवेल शहरात अनेक शाळांमध्ये शाळेच्या संचालकांच्या मदतीने ८वी व ९वी च्या विद्यार्थ्यांना 'मी एक विद्यार्थी, माझे सामर्थ्य किती ?' हा मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात अनेक नामवंत शिक्षकांनी दहावी साठी अभ्यासाची तयारी कशी करावी ?, अभ्यास करण्याची पद्धत कशा प्रकारे असली पाहीजे याबाबत मार्गदर्शन केले. यासाठी सोशल राईट्स फाऊंडेशनचे संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाने पनवेल शहर अध्यक्ष राहुल लोहकरे यांनी विविध शाळेत हे कार्यक्रम आयोजित केले. सदर प्रसंगी संजय बाळकृष्ण शिंदे, संतोष तोतरे, रजनी लोहकरे आदी शिक्षकांनी मुलांना अगदी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. याकामी पनवेल शहर कमिटीच्या सर्व सदस्यांनी अथक मेहनत घेतली.

## अंधेर नागरी चौपट राजा



मिरभाईदर मध्ये उत्तान डोंगरी गल्ली या परिसरात जवळ जवळ ७०० ते एक हजार आधार कार्ड इतरत्र फेकलेल्या अवस्थेत तेथील ग्रामस्थांना मिळाले एकी कडे सरकार आधार कार्ड शिवाय कोणतीही सुविधा देत नाही आणि येथे तर सर्रास आधार कार्ड च कचऱ्याच्या डब्यात दिसतात या मुळे नागरिकाचा या महत्त्वाच्या कार्डावरचा विश्वास उडाला आहे सादर कार्ड या कचऱ्याच्या डब्यात आली कशी याचा शोध स्थानिक नागरिक घेत आहेत.

# राज्यातील पालिका निवडणुकीच्या रिंगणात 'आप'ही

**मुंबई : धर्माच्या आधारे ध्रुवीकरण किंवा जातीधर्मात तेढ निर्माण करणाऱ्या भाजपला नाकारून पाच वर्षे चांगले काम केलेल्या आम आदमी पक्षाला दिल्लीकरांनी पुन्हा संधी दिली. हाच कल कायम राहिल्यास देशभर 'आप'चा पर्याय उभा राहू शकतो, अशी भूमिका पक्षाचे नेते खासदार संजय सिंग यांनी शुक्रवारी मांडली. एप्रिल महिन्यात होणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेसह भविष्यातील राज्यातील सर्व महापालिकांच्या निवडणुका पक्ष लढविणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.**



धर्माच्या आधारवर मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न भाजपने दिल्लीत केला होता. पण मतदारांनी आरोग्य, शिक्षण, वाहतूक, पायाभूत सुविधा क्षेत्रांमध्ये चांगले काम केलेल्या आम आदमी पार्टीलाच पसंती दिली, असे दिल्ली विधानसभा निवडणुकीतील पक्षाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजाविणारे राज्याचे प्रभारी संजय सिंग यांनी मुंबई प्रेस क्लबने आयोजित केलेल्या वार्तालपात सांगितले.

आम आदमी पार्टीने महिलांना मोफत प्रवास, २०० युनिटपर्यंत मोफत वीज, स्वस्त पाणी अशा सवलती देऊन अर्थकारण बिघडविल्याचा आरोप केला जातो. पण हा आरोप सिंग यांनी फेटाळला. आम आदमी पार्टी सत्तेत आली तेव्हा दिल्लीत वीज गळतीचे प्रमाण ३५ टक्के होते ते आता आठ टक्क्यांपर्यंत घटले. वीज कंपनी अव्वाच्या सव्वा दर वसूल करीत होती. दणका दिल्यावर वीज कंपनी सरळ झाली. पक्षाची सत्ता येण्यापूर्वी वार्षिक ३२ हजार कोटी रुपये कराच्या माध्यमातून जमा होत असत. गेल्या पाच वर्षांत करवसूली ६० हजार कोटींवर गेली. वीज गळती कमी झाल्याने पैसे उपलब्ध झाले. महसुलाचे प्रमाण वाढल्यानेही सरकारच्या तिजोरीत पैसा आला. यातूनच मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल सरकारने विविध सवलती नागरिकांना दिल्या. दिल्लीच्या सकल उत्पन्नाचा दर हा ८.६ टक्के असून, राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त असल्याकडे सिंग यांनी लक्ष वेधले.

शाहीन बाग किंवा अन्य मुद्द्यांवरून दिल्लीत भाजपने धार्मिक ध्रुवीकरण केले होते. गल्लोगल्ली धार्मिक उन्माद केला. समाजात तेढ निर्माण केली. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. दिल्लीकरांनी भाजपला नाकारले. दिल्लीतील विजयाच्या हॅटट्रिकनंतर राष्ट्रीय पातळीवर पक्षाला वाव मिळेल का, या प्रश्नाच्या उत्तरात सिंग म्हणाले, दिल्लीत पाच वर्षे चांगली कामे केल्यानेच लोकांचा भरघोस पाठिंबा मिळाला. काम करणाऱ्यांना लोकांनी स्वीकारण्याचे राजकारण यशस्वी झाल्यास देशभर 'आप'ला संधी मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### 'महाराष्ट्रात पक्षवाढीवर भर'

एप्रिल महिन्यात होणारी नवी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक लढविण्यात येणार असल्याची माहिती पक्षाच्या नेत्या प्रिती शर्मा मेनन यांनी दिली. दोन वर्षांनी होणाऱ्या मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील सर्व महानगरपालिका तसेच आगामी विधानसभा निवडणुकीत पक्ष ताकदीने उतरेल, असे संजय सिंग यांनी जाहीर केले. महाराष्ट्रात पक्षाकडे नेतृत्वाचा अभाव असला तरी हा प्रश्न सुटेल आणि मतदारांचा पाठिंबा मिळेल, असा विश्वासही सिंग यांनी व्यक्त केला. आम आदमी पार्टीचे संघटन काही राज्यांमध्ये फारच कमी आहे किंवा कमकुवत असल्याची कबुली देतानाच त्यांनी, यापुढील काळात पक्ष वाढीवर भर देण्यात येणार असल्याचे सांगितले. बिहार किंवा अन्य राज्यांच्या विधानसभा निवडणुकांची तयारी करण्यात येत आहे. पुढील सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत म्हणजे २०२४ पर्यंत आम आदमी पार्टी भाजपला पर्याय म्हणून पुढे यावा, असा प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले.

# 'बेस्ट' प्रवाशांत १३ लाखांची भर



**मुंबई :** प्रवासी भाडे थेट ५० टक्क्यांनी कमी करत मुंबईकरांना स्वस्तात मस्त प्रवास देणाऱ्या बेस्ट प्रवाशांच्या संख्येत गेल्या सात महिन्यांत १३ लाख ७७ हजार प्रवाशांची (दररोजचे सरासरी) भर पडली आहे. मात्र महसूलवाढीचे आव्हान कायम असून त्यात या काळात प्रति दिन सरासरी ५४ लाखांची घट झाली आहे.

बेस्टने ९ जुलै २०१९ पासून भाडेकपात केली. सध्या बेस्ट पाच किलोमीटरच्या साध्या प्रवासाकरिता पाच रुपये आणि वातानुकूलित प्रवासासाठी सहा रुपये भाडेआकारणी करते आहे. यामुळे बेस्टच्या प्रवासी संख्येत वाढ झाली. भाडेकपातीआधी दररोज सरासरी १९ लाख २३ हजार प्रवासी बेस्टने प्रवास करत होते. हीच संख्या भाडेकपातीनंतर जानेवारी २०२० पर्यंत सरासरी २९ लाख ५ हजारापर्यंत गेली. फेब्रुवारी महिन्यात पॉइंट टू पॉइंट सेवेमुळे त्यात आणखी भर पडली आहे. आता दररोज सरासरी ३३ लाख प्रवाशी बेस्टने प्रवास करत आहेत. वांद्रे, सांताक्रूझ, देवनार, शिवाजीनगर, घाटकोपर, मुलुंड आगारांतर्गत सुटणाऱ्या बसगाड्यांना चांगला प्रतिसाद प्रवाशांकडून मिळत आहे. प्रवासी वाढले असले तरी बेस्टच्या महसुलावर परिणाम झाला आहे. भाडेकपातीपूर्वी बेस्टला दररोज सरासरी २ कोटी ३६ लाख १६ हजार रुपये महसूल मिळत होता. हाच महसूल सरासरी १ कोटी ८२ लाख ११ हजार रुपयांवर आला आहे.

***सुट्ट्या नाण्यांनी बेस्टची तिजोरी भरली***

भाडेकपात झाल्यानंतर बेस्टची तिजोरी सुट्ट्या पैशांनी भरू लागली आहे. बेस्टकडे १२ कोटी रुपयांपेक्षाही सुटी नाणी जमा झाली आहेत. एक रुपया, दोन रुपये आणि पाच रुपयांच्या नाण्यांचा यात समावेश आहे.

# नवी मुंबईत कुजलेल्या अवस्थेत सापडल्या एकाच कुटुंबातील चौघांच्या डेड बॉडीज

**नवी मुंबई - तळोजा येथील फेज वनमधील सेक्टर ९ येथील एका सोसायटीत फ्लॅटमध्ये चौघांची मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. मृतांमध्ये दोन मुलं आणि पती-पत्नीचा समावेश आहे. चारही मृतदेह कुजले आहेत. पोलिस घटनास्थळी पोहोचले आहेत. सोसायटीत दुर्गंधी न पसरल्याने ही घटना समजली नसल्याचे सोसायटीतील नागरिकांनी सांगितले आहे.**



याबाबत मिळालेली माहिती अशी की, नवी मुंबईतील तळोजा सेक्टर ९ मधील शिव कॉर्नर सोसायटीत ही घटना घडली आहे. नितेशकुमार उपाध्याय यांचे कुटुंब भाडेतत्वावर राहत होते. नितेशकुमार उपाध्याय यांनी पत्नी, मुलगी, मुलगा यांची हत्या करून स्वत: गळफास लावून आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. चौघे मागील दोन महिन्यांपासून मृतावस्थे पडले असल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. चौघांचे मृतदेह कुजले आहेत. पोलिस पुढील तपास करत आहेत.

नितेश कुमार उपाध्याय यांनी मागील २ महिन्यांपासून घराचे भाडे दिले नाही. फोन देखील उचलत नसल्याने घरमालक ज्यावेळी घरी आले त्यावेळी सदर धक्कादायक घटना समोर आली. आत्महत्या करणाऱ्यांमध्ये ३५ वर्षीय व्यक्ती, ३० वर्षीय महिला, ७ मुलगी आणि ८ वर्षीय मुलगा असल्याचे स्पष्ट झाले आहे. पत्नी आणि मुलांना गळफास लावून त्यांची हत्या करण्यात आली असून नंतर नितेशकुमार यांनी आत्महत्या केली असावी, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. सदर घटनेचा सर्व बाजूने तपास करण्यात येईल, अशी प्रतिक्रिया उपायुक्त अशोक दुधे यांनी दिला आहे.

# शासनाकडून राज्यात फॅब तंत्रज्ञानाची परवडणारी घरे

**मुंबई :** राज्यातील तालुक्याच्या ठिकाणी छोट्या आकारमानाची ३०० ते ४०० चौरस फुटाच्या अत्यंत परवडणाऱ्या दरातील सदनिका नागरिकांना बांधून देण्याचा शासनाचा मानस आहे.

या सदनिका प्री-फॅब तंत्रज्ञानावर बांधल्यास परवडणाऱ्या दरात नागरिकांना सदनिका उपलब्ध करून देता येतील. यासाठी बांधकाम क्षेत्रातील नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा उपयोग करून स्वस्त दरातील गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यासाठी जागतिक स्तरावर निविदा मागवाव्यात, अशी सूचना गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे.

'महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणा'च्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात अलीकडे झालेल्या आढावा बैठकीत आव्हाड यांनी या सूचना केल्या. राज्यातील घरांची वाढती मागणी आणि पुरवठा यातील वाढती तफावत लक्षात घेता गृहनिर्मितीच्या कामाला वेग देणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करून आव्हाड यांनी, राज्यात प्रधान मंत्री आवास योजनेची अंमलबजावणी सक्षमतेने करण्याचे आदेश दिले. म्हाडाच्या अखत्यारीत राज्यात उपलब्ध असलेल्या भूखंडांचा संपूर्ण तपशील आठवड्याभरात सादर करण्यासही त्यांनी सांगितले आहे.

१९६९ नंतरच्या उपकरप्राप्त इमारतींसंदर्भात धोरण ठरविण्याबाबत विकासकांबरोबर झालेल्या चर्चेत उपकरप्राप्त इमारतींच्या समूह पुनर्विकासासाठी मुंबईतील उपकरप्राप्त जमिनींचे मालक, भाडेकरू-रहिवाशी यांनी पुढे येण्याची गरज असल्याचे आव्हाड यांनी सांगितले. उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासानंतर म्हाडास प्राप्त होणाऱ्या अतिरिक्त क्षेत्रफळाच्या वितरणाबाबत धोरण लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

# ठाण्यातील मनोरुग्णालयाचे भवितव्य अधांतरी

**मुंबई :** महाविकास आघाडी सरकारने ठाणे आणि मुलुंडदरम्यान नव्या रेल्वे स्थानकाच्या निर्मितीसाठी ठाणे मनोरुग्णालयाच्या १४.८३ एकर भूखंडावरील आरक्षणात बदल केला आहे. याबाबतचा आदेश जारी करताना मनोरुग्णालयाच्या जागेच्या बदल्यात तेवढीच जागा आणि सुसज्ज रुग्णालय बांधून देण्याबाबत कोणतीही लेखी हमी नगरविकास विभागाने आरोग्य विभागाला दिलेली नाही. त्यामुळे मनोरुग्णालयाचे भवितव्य अधांतरी आहे.

मनोरुग्णांची संख्या वेगाने वाढत असताना नव्या मनोरुग्णालयांची नितांत गरज आहे. त्यामुळे विस्तारित रेल्वे स्थानकासाठी जागा हवी असल्यास आरोग्य विभागाला मनोरुग्णालयासाठी जागा देण्याबरोबरच सुसज्ज मनोरुग्णालय बांधून देणे, तसेच जिल्हा रुग्णालय आणि सामान्य रुग्णालय बांधून देण्याची स्पष्ट भूमिका आरोग्य विभागाने घेतली होती. मनोरुग्णालयाच्या जागेचे आरक्षण बदलून ही जागा रेल्वे स्थानक तसेच स्मार्ट सिटीच्या नावे ठाणे पालिकेला देण्यापूर्वी आरोग्य विभागाला या जागेचा मोबदला बाजारभावाने मिळाला पाहिजे, तसेच सुसज्ज मनोरुग्णालयाची इमारतही बांधून मिळाली पाहिजे, अशी भूमिका मुख्य सचिव अजोय मेहता यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने अहवालात घेतली. तथापि, नगरविकास विभागाने मनोरुग्णालयाचे आरक्षण बदलण्यासाठी काढलेल्या अधिसूचनेत त्याबाबत कोणताही उल्लेख नाही.

ठाणे रेल्वे स्थानकावर प्रवाशांचा येणारा ताण लक्षात घेऊन ठाणे व मुलुंडदरम्यान नवे रेल्वे स्थानक उभारण्यासाठी नगरविकासमंत्री आणि ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे गेल्या अनेक वर्षांपासून आग्रही होते. आरोग्यमंत्री असताना शिंदे यांनी नियोजित रेल्वे स्थानकासाठी मनोरुग्णालयाची जागा घेताना त्याबदल्यात ठाणे येथे अन्यत्र १४.८३ एकर जागा देऊन सुसज्ज मनोरुग्णालय बांधून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर शिंदे यांच्याकडे नगरविकास मंत्रालय आल्यानंतर ठाणे मनोरुग्णालयाच्या जागेवरील आरक्षण बदलाला वेग येऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे गेल्या आठवड्यात सर्व संबंधितांची बैठक झाली. हा भूखंड याआधी ठाणे मनोरुग्णालय, पंपींग स्टेशन, पालिका प्राथमिक आणि माध्यमिक शाळा यासाठी आरक्षित होता. नव्या अधिसूचनेनुसार, आता हा भूखंड रेल्वे स्थानक, बस टर्मिनस आणि १२, १८ व २४ मीटर रुंदीचे तीन सार्वजनिक रस्ते यासाठी आरक्षित करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

ठाणे मनोरुग्णालयाची एकूण ६६ एकर जागा असून, यातील १४.८३ एकर जागेवरील आरक्षणात बदल करण्यात आला आहे. १९०१ सालापासून हे रुग्णालय अस्तित्वात असून, एका दानशूर व्यक्तीने दिलेल्या जमिनीवर हे रुग्णालय उभे आहे. यातील साडेचार एकर जागेवर अतिक्रमण झाले असून, तिथे ९९३ झोपड्या आहेत. त्यातील ७२३ पात्र ठरविण्यात आल्या असून, याशिवाय कर्मचारी वसाहती व रुग्णालयाच्या इमारती आहेत. मनोरुग्णालयात एकूण १८५० खाटा मंजूर असून त्यापैकी ८०० खाटा स्त्री मनोरुग्णांसाठी आहेत. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत मानसिक आजाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता ठाणे मनोरुग्णालयाचे बळकटीकरण व विस्तारासाठी शासनाने निधी देण्याची गरज असताना रेल्वे स्थानकाच्या नावाखाली मनोरुग्णारुग्णालयाच्या जागेवर डल्ला मारला जात असल्याचा आरोप होऊ लागला आहे.

# किनारा मार्गासाठी ६०० झाडांवर संक्रांत



**मुंबई : महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या सागरी किनारा महामार्गासाठी तब्बल ६०० झाडांवर संक्रांत ओढवणार आहे. यापैकी १४० झाडे कापावी लागणार असून ४६० झाडांचे पुनरेपण करण्याचा प्रस्ताव आहे. यासंदर्भात येत्या २८ फेब्रुवारी रोजी सुनावणी होणार आहे. मात्र या सुनावणीसाठी केवळ अर्ध्या तासाची वेळ ठेवण्यात आल्याने नाराजी व्यक्त होत आहे.**

आरेतील मेट्रोच्या कारशेडसाठी झाडे तोडल्याच्या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेणारी शिवसेना मुंबई महापालिकेत सत्तास्थानी आहे. असे असताना किनारी मार्गासाठी होणाऱ्या या वृक्षतोडीबाबत शिवसेनेची भूमिका काय असेल, याबद्दल उत्सुकता आहे. शिवसेनेचे पक्षप्रमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या सागरी किनारा महामार्गासाठी प्रिन्सेस स्ट्रीट ते वरळी दरम्यानची ६०० झाडे हटवावी लागणार आहेत. भुलाबाई देसाई मार्गावर पालिकेने तशा नोटिसा लावल्या आहेत.

पालिकेच्या उद्यान विभागाने याबाबतची नोटीस १७ फेब्रुवारीला प्रसिद्ध केली असून नागरिकांचे आक्षेप किंवा सूचना असल्यास सात दिवसांत जिजामाता उद्यानातील उद्यान अधीक्षक यांच्या कार्यालयात लेखी देण्याबाबत कळवले आहे. तसेच याप्रकरणी २८ फेब्रुवारीला उद्यान अधीक्षकांच्या कार्यालयात दुपारी अडीच वाजता सुनावणी होणार असून त्यासाठी केवळ अर्धा तास देण्यात आला आहे. ६०० झाडे विस्थापित अथवा नामशेष होणार असताना त्याबद्दलच्या सुनावणीसाठी केवळ अर्धा तास देण्यात आल्याबद्दल पर्यावरणप्रेमींमध्ये नाराजी आहे.

### प्रस्ताव काय?

- प्रिन्सेस स्ट्रीट ते प्रियदर्शिनी पार्क येथील ३१ झाडे कापणार. १२७ झाडांचे पुनरेपण.
- भुलाबाई देसाई मार्ग ते टाटा गार्डन रस्त्याच्या रुंदीकरणासाठी ६१ झाडांची कापणी. ७९ झाडांचे पुनरेपण.
- हाजी अली ते लोटस जंक्शन येथील ३८ झाडे तोडणार. ४९ झाडांचे पुनरेपण. वरळीतील १० झाडे तोडणार. २०५ झाडांचे पुनरेपण.

# तुमच्या पूर्वजांनी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक का नाकारला होता

## नवाब मलिकांचा भाजपाला सवाल



**मुंबई:** मी छत्रपती शिवाजी महाराज ती जय बोलतोय तरी देखील भाजपाकडून माझा व्हिडिओ चूकीच्या पद्धतीने व्हायरल करत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आणि राज्याचे मंत्री नवाब मलिक यांनी केला आहे. तसेच तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तुलना शिवाजी महाराज यांच्यासोबत केली होती. त्याचप्रमाणे तुमच्या पूर्वजांनी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक का नाकारला होता असा सवाल नवाब मलिक यांनी भाजपाला विचारला आहे. नवाब मलिक यांचा शिवस्वराज्य यात्रेमधील एक जुना व्हिडिओ व्हायरल करण्यात येत आहे. यावर बोलताना नवाब मलिक यांनी भाजपावर निशाणा साधला आहे.

दोन वर्षापुर्वी शिवस्वराज्य यात्रेतील रायगडावर पक्षाचे सर्व नेते एकत्र फोटो काढण्यासाठी जवळ आले होते. यावेळी राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय अशी घोषणा केली. त्यावेळी सर्वजण जय म्हणाले मी सुद्धा जय म्हणालो. फक्त हात वरती केला नाही याचा भाजपावाले वेगळा प्रचार करत आहेत असेही नवाब मलिक यांनी सांगितले. मलिकांचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट पसरली होती.

मी छत्रपती शिवाजी महाराज की जय अशी घोषणा दिली आणि आजही देत आहे. शासनाच्या शिवभोजन थाळीच्या उद्घाटनप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज की जय बोलून सुरुवात केली होती याची आठवण नवाब मलिक यांनी भाजपाला करुन दिली आहे.

### तेव्हाही बोललो आणि आजही बोलतोय 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'

रायगड किल्ल्यावरील या व्हिडिओमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक, सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे, आमदार अवधुत तटकरे, विद्या चव्हाण आणि माजी मंत्री फौजिया खानही उपस्थित आहेत. यामध्ये धनंजय मुंडे छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जयघोष करत असताना यात नवाब मलिक मात्र गप्प बसल्याचं दिसत आहे. अजित पवारांसह अन्य जण शिवरायांच्या नावाने जय म्हणताना दिसत आहे. त्यामुळे शिवप्रेमींनी या व्हिडिओ पोस्ट करुन नवाब मलिक आणि राष्ट्रवादी काँग्रेसवर निशाणा साधला होता.

# मानधनवाढीच्या मागणीसाठी आरोग्य विभागाचे डॉक्टर आंदोलनाच्या तयारीत



**मुंबई :** नक्षलग्रस्त विभागासह अतिदुर्गम भागात काम करणाऱ्या आरोग्य विभागाच्या भरारी पथकातील डॉक्टरांनी मानधनवाढीसाठी आंदोलनाचे हत्यार उपसण्याचा निर्णय घेतला आहे. विधिमंडळाच्या अधिवेशन काळात आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा इशारा या डॉक्टरांनी दिला आहे.

राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांतील गावखेड्यांत, तसेच पाड्यांवर डॉक्टरांची सेवा उपलब्ध व्हावी यासाठी १९९५ साली 'भरारी पथका'ची स्थापना करण्यात आली होती. या पथकात बीएएमएस डॉक्टरांचा समावेश करण्यात येऊन त्यांना एक जीपगाडी, औषधे आणि साहाय्यक देऊन त्यांच्या माध्यमातून पाड्या पाड्यात वैद्यकीय सेवा देण्यात येऊ लागली. यासाठी सुरुवातीला या डॉक्टरांना सोळा हजार रुपये मानधनापोटी देण्यात आले. यात २०१५ मध्ये वाढ करून आरोग्य विभागाकडून १८ हजार तर आदिवासी विभागाकडून ६ हजार असे २४ हजार रुपये मानधन देण्यात येऊ लागले.

आरोग्य विभागाच्या पूर्णवेळ गाडी चालकालाही आजघडीला या डॉक्टरांहून अधिक वेतन मिळत असून नक्षलग्रस्त तसेच दुर्गम आदिवासी भागात काम करणाऱ्या १७३ डॉक्टरांना मात्र अवघ्या २४ हजार रुपये मानधनावर राबावे लागत आहे. भरारी पथकाचे १७३ डॉक्टर दरमहा हजारो रुग्णांवर तसेच स्तनदा माता आणि अंगणवाड्यांमधील बालकांना तपासून उपचार करतात. आदिवासी विभागाने त्यांचे मानधन वाढवून १८ हजार करावे असा प्रस्ताव आरोग्य विभागाने आदिवासी विभागाला पाठवला असून गेल्या वर्षभरात त्यावर आदिवासी विभागाने निर्णय घेतला नसल्याचे भरारी पथकाच्या डॉक्टरांनी आदिवासी मंत्री के. सी. पाडवी यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

**मुख्यमंत्र्यांना निवेदन :** याबाबतचे निवेदन डॉ. शेषराव सूर्यवंशी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आदिवासी मंत्री पाडवी तसेच आरोग्यमंत्री राजेश टोपे यांना दिले आहे. आरोग्य विभागातील अन्य डॉक्टरांप्रमाणे किमान ५० हजार रुपये मानधनापोटी आम्हाला मिळावे, अशी मागणी या डॉक्टरांनी केली असून मागणी मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा या डॉक्टरांनी दिला आहे.

# आता गर्दीतही ओळखता येणार गुन्हेगारांचा चेहरा

**मुंबई :** बंगळुरू, भुसावळ आणि मनमाड स्थानकांनंतर मुंबईत चेहऱ्याची ओळख पटविणारी यंत्रणा (फेशिअल रेकॉगनिएशन सिस्टीम) बसविण्यात येणार आहे. यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची मदत घेतली जाईल. या यंत्रणेमुळे हरविलेली व्यक्ती, फरार आरोपींचा शोध घेणे सोपे होईल. मध्य रेल्वे मार्गावरील रेल्वे सुरक्षा बलाच्या वतीने हा नवा उपक्रम राबविण्यात येणार आहे.



मध्य रेल्वे मार्गावरून दररोज ४६ लाख प्रवासी प्रवास करतात. या प्रवासादरम्यान रोजच वेगवेगळे गुन्हे घडतात. सध्या गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी मध्य रेल्वेच्या विविध स्थानकांवर एकूण ३ हजार १४० सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहेत. आता या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये फेस डिटेक्शन तंत्रज्ञानाचा समावेश करून नवी यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. त्याद्वारे या कॅमेऱ्यांमध्ये होणाऱ्या रेकॉर्डिंगचा वापर चेहरे ओळखण्यासाठी केला जाईल.

### असे होईल काम

चेहऱ्याची ओळख पटविणाऱ्या यंत्रणेची सर्व कामे नियंत्रण कक्षातून केली जातील. या यंत्रणेत संबंधित व्यक्तीचा फोटो अपलोड केल्यावर, ती व्यक्ती कोणत्या दिवशी कोणत्या स्थानकावर होती, याची इत्थंभूत माहिती रेल्वे सुरक्षा बलाला मिळेल. सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे ३० ते ४० मीटर अंतरावरील सर्व चेहरे स्कॅन केले जातील.

पृष्ठ १ वरुन

## CAA : दिल्लीत हिंसाचाराचा उद्रेक

यावेळी आंदोलकांकडून गोळीबार देखील करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, परिसरातील तीन वाहनं देखील पेटवून देण्यात आली आहेत. शिवाय, समाजकंटकांडून काही दुकानं जाळण्याचा देखील प्रयत्न करण्यात आला असल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली आहे.

मौजपूर परिसरात देखील सलग दुसऱ्या दिवशी सीएएचे आंदोलक व समर्थकांमध्ये मोठा वाद उफळला. यावेळी करण्यात आलेल्या दगडफेकीत दोन पोलिसांसह १५ जण गंभीर जखमी झाले. पोलिसांनी मौजपूरकडे येणारे मार्ग काही काळासाठी बंद केले आहेत. येथील वातारवण अतिशय तणावग्रस्त असल्याची माहिती समोर येत आहे.

## संपादकीय...

# आरक्षणाची रणभूमी


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना ज्यांना शेकडो वर्षे शिक्षणाचा, ज्ञानाचा आणि त्यामुळे ऐहिक उत्कर्षाचा स्पर्श होऊ शकला नाही, अशा देशातील हजारो जाती-पाती आणि लोकसमूहांसाठी राखीव जागांची व्यवस्था केली. यावेळी, घटना समितीत डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, हे मागे पडलेले लोकसमूह शिकून शहाणे होतील. इतर समाजाच्या बरोबरीने वाटचाल करतील. मग त्यांना या स्वतंत्र व्यवस्थेची गरज राहणार नाही. त्या अर्थाने ही हंगामी व्यवस्था आहे. साऱ्या देशातील दलित, ओबीसी, आदिवासी, भटके-विमुक्त आणि इतरही अनेक मागास जाती यांना आरक्षणाचा हात दिल्याशिवाय त्यांची प्रगती शक्य नाही, हे कायदेमंडळाने जाणले. त्यामुळेच, घटनाकारांनी केलेली आरक्षणाची तरतूद जशी अनेक समूहांबाबत विस्तारली, तसा तिचा कालावधीही वाढत गेला. आज जो नवा पेच आला आहे, तो सर्वोच्च न्यायालयाच्या राज्यांवर सरकारी नोकरीमध्ये आरक्षण ठेवण्याची सक्ती करता येणार नाही, या निर्णयामुळे. हा फार दूरगामी परिणाम करणारा निर्णय ठरू शकतो. तो किती संवेदनशील आहे, हे सोमवारच्या संसदेतील कामकाजात पडलेल्या प्रतिबिंबावरूनही दिसते.




यावेळी, सत्ताधारी आणि विरोधक यांनी परस्परांवर आरोपांची चिखलफेक केली असली तरी हा विषय तातडीने दखल घेण्याजोगा आहे, हे लोकप्रतिनिधींना समजल्यामुळेच सभागृहांमध्ये तो निघाला. या विषयात केंद्र सरकार संसदेत लवकरच सविस्तर निवेदन करील, हे तर उघड आहे. आरक्षणाच्या चालत आलेल्या धोरणाशी असणारी बांधिलकी केंद्र सरकारला या निवेदनात अधोरेखित करावी लागेल. पण खरा प्रश्न आहे तो, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा. हे प्रकरण उत्तराखंड सरकारशी संबंधित आहे आणि ते आजचे नाही. ते २०१२ पासून चालू आहे.

सरकारी भरती करताना उत्तराखंडमधील तेव्हाच्या काँग्रेस सरकारने अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव जागा ठेवल्या नाहीत. पुढे हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले. तेव्हा राज्य सरकारचा हा निर्णय उच्च न्यायालयाने रद्द ठरविला. त्याला राज्य सरकारने सुप्रीम कोर्टात दिलेल्या आव्हानाचा हा निकाल आहे. सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश देताना जी निरीक्षणे नोंदविली, त्यातले महत्त्वाचे म्हणजे, आरक्षण हा मूलभूत अधिकार नाही आणि राज्य सरकारने आरक्षण न दिल्याने नागरिकांच्या कोणत्याही मूलभूत अधिकारांचा भंग होत नाही, हे होय.

त्यामुळेच, भरती आणि बढती यात आरक्षण ठेवा, असा आदेश उत्तराखंड सरकारला देण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. मात्र, हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारीत असल्याने ते कोणत्याही समाजाच्या विकासाचे मोजमाप करून आरक्षणचा निर्णय घेऊ शकतात, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

याचा अर्थ, सगळीच राज्ये नोकऱ्यांबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतील. आता या निर्णयाला आव्हान द्यायचे तर घटनापीठाकडे हा विषय सोपवावा, अशी विनंती केंद्र सरकारला सरन्यायाधीशांना करावी लागेल. तसे घटनापीठ झाले तरच या विषयाचा काय तो अंतिम निकाल लागू शकेल. १९९१नंतर उदारीकरणामुळे देशात खासगी रोजगाराच्या तसेच उद्योगांच्या असंख्य संधी निर्माण झाल्या आहेत. त्याआधी १९९० मध्ये तेव्हाचे पंतप्रधान व्ही. पी. सिंह यांनी न्यायमूर्ती बी. पी. मंडल यांचा अहवाल स्वीकारल्यानंतर सारा देश ढवळून निघाला होता. हा आयोग खरेतर १९७९मध्ये पहिल्या जनता सरकारने नेमला होता. 'सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागे पडलेले समाजसमूह ओळखून त्यांच्यासाठी आरक्षणाची व्यवस्था करणे' हा या आयोगाच्या अहवालाचा सारांश होता. पण आजही अनेक राज्यांनी मंडल आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी केलेली नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निकालानेही राज्यांना याबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. या निकालात केंद्र सरकार पक्षकार नव्हते आणि या निकालाचा केंद्र सरकारशी थेट संबंध नाही, असे सरकारने संसदेत सांगितले असले तरी मोदी सरकारला या विषयापासून दूर राहता येणार नाही. खरेतर, जनगणनेच्या जोडीने समाजातील सर्व घटकांच्या शिक्षणाचा, प्रगतीचा आणि वाटचालीचा अतिशय विस्तृत असा सांगोपांग अभ्यास होण्याची गरज आहे. अनेक दशके आरक्षणाचे धोरण असूनही ज्यांच्या दारात शिक्षणाची व विकासाची गंगा मुळीच पोहोचलेली नाही, त्यांच्यासाठी काय करता येईल, याचा विचार नेहेमीच्या अभिनिवेशी चर्चा थोड्या बाजूला ठेवून करावा लागेल. त्यासाठी, पहिली परीक्षा राजकीय पक्षांची आहे. त्यांनी कोते राजकारण केले नाही तर या निकालाने निर्माण झालेल्या परिस्थितीतून सर्वमान्य तोडगा काढता येईल.

# मेट्रो ३ चे सत्य - भूयारी रेल्वे, 'मौत का कुवा'

## मुंबईकरांनो वेळीच जागे व्हा

ॲड. गिरीश राऊत

(क्रमशः)

५) अत्यंत गंभीर बाब : प्रकल्पाच्या अहवालातील कार्यकारी सारांशात मुद्दा क्र. ५ मधे म्हटले आहे की हा भूयारी रेल्वे प्रकल्प केला नाही तर तेवढीच वाहतुकीची सेवा देण्यासाठी ४५० बस विकत घ्याव्या लागतील व त्यासाठी २२० कोटी रूपये खर्च होईल.

आता या प्रकल्पाचा खर्च अहवालांप्रमाणे सुरवातीलाच २४३४० कोटी रूपये होता. त्यात आता १५००० कोटी रू. ची भर पडली आहे. पुढील काही वर्षांत अजून वाढवला जाईल. २२० कोटी रू. खर्चाच्या उपायासाठी २४३४० कोटी रू. चा प्रकल्प?

यातुन हा प्रकल्प म्हणजे किती मोठा विध्वंसक मूर्खपणा आणि मुंबई व महाराष्ट्राची फसवणूक व लूट आहे ते लक्षात येते.

या मेट्रोचे तिकिट किमान ३०० रूपये असेल. वरून धावणाऱ्या रेल्वेप्रमाणे एका वेळी हजारो प्रवाशांची वाहतूक केली जाणार असा अनेकांचा गैरसमज आहे. पण ही आता फक्त दोन व काही वर्षांनी थोड्या जास्त डब्यांची गाडी असणार. त्यात सामान बरोबर नेता येणार नाही आणि प्रवासाला दोन तासापेक्षा जास्त वेळ लागेल. किती मुंबईकरांना हे चालेल?

६) या प्रकल्पासाठी अहवालात दिलेली पर्यावरणीय पायाभूत माहिती असत्य आहे.

उदा. कार्बन डायऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड, सल्फर डायऑक्साईड आणि हायड्रोकार्बनचे मुंबईच्या वातावरणातील प्रमाण परवानगीयोग्य मर्यादेत आहे.

आपण जाणता की लॅन्सेट व इतर मान्यवर वैज्ञानिक संस्थांनी गेल्या काही वर्षांत मुंबईचा जगातील पहिल्या पाच अतिप्रदूषित शहरांत समावेश केला आहे. हे शहर गॅस चेंबर बनल्याचा अनुभव प्रत्येक नागरिक घेतच असतो. महापालिकेचे अहवाल १९९८-९९ सालातच नमूद करतात की रोज अस्थम्याचे २००० व ब्राँकॉयटीसचे १५०० नवे बालरूग्ण इस्पितळात नोंदले जातात. गेल्या वीस वर्षांत वायूप्रदूषण वाढत गेले. त्या पार्श्वभूमीवर प्रकल्प पूर्ण खोट्या माहितीवर आणला आहे.

७) एम एम आर डि ए या नियोजनाची जबाबदारी असलेल्या वरिष्ठ यंत्रणेने दि. ६ डिसेंबर २०१७ रोजीच्या सांताक्रूझच्या नागरिकांना दिलेल्या पत्रात मुंबईत भूयारी रेल्वे करू नये असे स्पष्ट केले आहे. याची ११ कारणे दिली आहेत. यात प्रवासी वाहतूकीची क्षमता नसणे व इतर तांत्रिक मुद्दे दिले आहेत. दोन्ही बाजूस २५ मीटरपर्यंत विकासावर निर्बंध असल्याचे नमूद केले आहे. ११ व्या मुद्यात मुंबईत वारंवार पूर येतो हा देखील मुद्दा आहे.

महापालिकेच्या आराखड्यात मेट्रोपासुन १०० मीटरपर्यंतचे क्षेत्र निर्बंधित क्षेत्र म्हणून दाखवले आहे.

८) २६ जुलै २००५ ला मुंबईत हजारो माणसे ५ ते २२ फूट पाण्यात बुडून मरण पावली. तापमानवाढीमुळे अशी भयंकर अतिवृष्टी किंवा वादळामुळे समुद्राचे आक्रमण कधीही घडू शकते. अशा स्थितीत इतर शहरांनी पूर्वी केली म्हणून आम्हीही भूयारी रेल्वे करणार ही भूमिका धोकादायक आहे.

९) सरळ माहिती मिळत नसल्याने वीजवापराच्या तपशीलाबाबत माहिती अधिकाराखाली विचारणा केली असता एम एम आर सी एल कडून दि. १६ एप्रिल २०१८ रोजी मिळालेले उत्तर 'माहिती उपलब्ध नाही कारण ३ क्र. ची मेट्रो सेवा अजून सुरू झालेली नाही.' असे बेपर्वाईचे आहे. नागरिकांना कस्पटासमान वागवण्याची वृत्ती व पारदर्शकतेचा पूर्ण अभाव दिसतो.

१०) या भूयारी रेल्वे प्रकल्पाने आझाद मैदान प्रभादेवीचे नर्दुल्ला टँक मैदान माहीमचे देसाई मैदान प्रभादेवीचे साने गुरूजी उद्यान अशा आबालवृद्ध नागरिकांसाठी शुद्ध हवा आरोग्य खेळ मनोरंजनाच्या आधीच शहरात दुर्मिळ असलेल्या मोकळ्या जमिनी व्यापल्या आहेत व नागरिकांच्या आयुष्यातील महत्त्वाची वर्षे नासवली आहेत.

११) या भूयारी रेल्वे प्रकल्पाच्या कामामुळे अनेक रस्ते बंद केले गेले. वाहतुक कोंड्या झाल्या. बेस्ट सेवेवर मोठा दुष्परिणाम झाला. इमारतींच्या दरवाजात आडिच तीन फूटांवर, शेकडो फूट लांब बॅरिकेड आल्याने असह्य त्रास झाला. वेळीच उपचारांसाठी इस्पितळात दाखल न करता आल्याने नागरिक मरण पावले. अनेक भागात दुकानदारी बंद झाली. हजारोंच्या नोकऱ्या गेल्या. दादरच्या कित्ते भंडारीसारख्या संस्थांचे हॉलचे उत्पन्न बुडाले.

केवळ भविष्यात वाहतुक सुधारणार आहे या थापेवर विश्वासून गोबेल्स धर्तीच्या प्रचाराला बळी पडून नागरिक हा अन्याय सहन करत आहेत. गेल्या चोवीस वर्षे वाहतूकीबाबत ही फसवणूक चालू आहे आणि त्या काळात रस्त्यावर वाहतूकीचे खरे माध्यम असलेली बेस्ट बस व पादचाऱ्यांचे खच्चीकरण केले गेले आहे. शहर अधिकाधिक गर्तेत जात आहे. १९९५ पासून जे करायचे नव्हते ते प्रकल्प केले व ज्या बेस्ट बसेसमधे आणि रेल्वेत वाढ करायची ती केली नाही म्हणून मुंबईत अपघातात रोज १५ - २५ माणसे मरतात. हे घडण्यास कारण असलेले सनदी अधिकारी आपला गुन्हा लपवून पुन्हा मेट्रो करूद्या नाहीतर बळी जात राहतील आणि त्याला तुम्ही झाडे तोडण्यास विरोध करणारे जबाबदार असाल असा कांगावा करतात. वाहतुकीबाबत याच अधिकाऱ्यांनी अंधारात ठेवल्याने जनता या ब्लॅकमेलिंगला बळी पडते. हे थांबले पाहिजे. आय ए एस अधिकाऱ्यांना खुप ज्ञान असते व ते देशाची सेवा करतात असा जनतेचा समज आहे. त्याचा गैरफायदा घेऊन अधिकाऱ्यांनी मुंबईला चुकीच्या रस्त्याने नेले. यांनी खरे आकलन गाडून केलेल्या प्रकल्पांमुळे, निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे मुंबईचे नागरिक मेले.

१२) हा प्रकल्प करताना लाखो टन सीमेंट, हजारो टन स्टील व इतर बांधकाम साहित्य लागत आहे. यासाठी डोंगर जंगल तोडले जात आहे. मातीचा अमुल्य थर नष्ट होत आहे व झरे, नद्यांची व्यवस्था मोडली जात आहे. वीजनिर्मितीत व मेट्रो गाड्या बनवण्यातही भयंकर स्वरूपाचा नाश होतो. भूयार खणल्यावर निघालेली माती व दगड टाकल्याने सागर, खाड्यांची हानी होते. तापमानवाढीमुळे मानवजात व जीवसृष्टी नष्ट होणे सुरू झाले आहे. सर्वत्र ५०ष्टसे वर तापमान गेल्याने पूर्ण ऑस्ट्रेलियातील जंगलांना लागलेले वणवे तेच दाखवत आहेत. जर्मनीने कोळसा जाळून वीजनिर्मिती (औष्णिक विद्युत) व अणुऊर्जा प्रकल्प बंद केले आणि मोटारी थांबवण्यासाठी उत्कृष्ट सार्वजनिक बस सेवा विनामूल्य केली आहे. आपल्याकडे उलट वागत आहेत. सीमेंट, वीज वापर वाढवणारी मेट्रो आणून असलेली उत्तम बेस्ट बस सेवा संपवली जात आहे. पृथ्वीच्या जीवनाच्या विनाशास गती देणारा हा प्रकल्प पर्यावरणास घातक आहे. उच्च न्यायालयाने या प्रकल्पावर लक्ष ठेवले जात आहे म्हणून निकालपत्रात उल्लेख केलेल्या ( UNFCCC - UNITED NATIONS FRAMEWORK CONVENTION ON CLIMATE CHANGE ) संयुक्त राष्ट्रसंघाच्या हवामान बदल व तापमानवाढ विषयक संस्थेकडे त्याबाबत विचारणा केली असता कोणतीही माहिती मिळाली नाही. मुळात याला पर्यावरणस्नेही प्रकल्प मानणे हाच विनोद आहे. केवळ पाश्चात्य व इतर काही शहरात आहे म्हणून येथे भूयारी रेल्वे करणे अयोग्य आहे. यात कुठेही राजकारण येऊ नये.

दिल्ली व जगातील इतर देशांच्या अनुभवावरून लक्षात आले होते की मेट्रोमुळे प्रदूषण व विलंबाचा एकूण प्रश्न सुटत नाही. बस वाहतुक हाच उपाय आहे. या प्रकल्पाची शिफारस कोणत्याही वाहतुक अहवालाने केली नाही. हा नियोजनाचा कधी भाग नव्हता. पायाभूत संरचना विकास, वेगवान प्रवास व प्रदूषण कमी करण्याची खोटी आश्वासने देऊन जनतेची दिशाभूल केली आहे. मुंबईचे रहिवासी ही फसवणूक सहन करणार काय?

स्वातंत्र्यलढ्याच्या पिढीचे प्रतिनिधी असलेल्या आर जी कर्णिक व दिनूभाऊ रणदिवे या व इतर ज्येष्ठ मान्यवरांनी व शेकडो नागरिकांनी ठिकठिकाणी या प्रकल्पाविरोधात लेखी मत नोंदवले आहे.

मुंबईतील शेकडो किंवा हजारो नागरिकांचे प्राण घेणारी दुर्घटना नक्की घडवणार असलेला हा बोगस प्रकल्प ताबडतोब रद्द करण्याची व नागरिकांना वाचवण्याची गरज आहे.

# महापौरपदाचा वाद : नाराज आमदार भाजपाची साथ सोडणार

## भाजपा अंतर्गतच नगरसेवकांचा घोडेबाजार होत असल्याचा आरोप

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी भाजप पक्षांतर्गतच नगरसेवकांच्या घोडेबाजाराला सुरुवात झाली असल्याचे दिसून येत आहेत. तसेच आपल्या मागणीतील महापौराला वगळण्यात येत असल्यामुळे नाराज आमदार गीता जैन यांनी भाजपाची साथ सोडण्याचा निर्णय घेतला आहे.**



मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महापौरपदासाठीची निवडणूक येत्या २६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या वेळी महापौरपद हे अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव असून महापौर डिंपल मेहता यांचा महापौरपदाचा कार्यकाल येत्या २७ फेब्रुवारी रोजी संपत आहे. त्यामुळे २८ फेब्रुवारीपर्यंत नवीन महापौरांची निवड होणे आवश्यक आहे. आमदार गीता जैन आणि माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्यामधील अंतर्गत वादामुळे नगरसेवकांच्या घोडेबाजीला सुरुवात झाली असल्याचे दिसून येत आहे. आपल्या गटातील नगरसेवक फुटू नये म्हणून माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी भाजप पक्षातील काही नगरसेवकांना दक्षिण गोव्यातील पंचतारांकित हॉटेलमध्ये हलवले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेत भाजपचे ६१, शिवसेनेचे २२ आणि काँग्रेसचे १२ नगरसेवक आहेत. महापौरपदाकरिता एकूण ४९ नगरसेवकांचे समर्थन आवश्यक असणार आहे.

या वेळी अनुसूचित जाती प्रवर्गातुन ज्योत्स्ना हसनाळे, नीला सोन्स, रुपाली शिंदे आणि दौलत गजरे महापौरपदासाठीच्या स्पर्धेत आहेत. तर विरोधी पक्षातून केवळ अनंत शिर्के एकमेव पात्र असल्यामुळे उमेदवार असणार आहेत. अशा परिस्थितीत आपले राजकीय वर्चस्व टिकून ठेवण्याकरिता माजी आमदार नरेंद्र मेहता हे नगरसेविका रुपाली शिंदे यांना महापौर बनवण्याकरिता प्रयत्न करत आहेत तर आमदार गीता जैन नगरसेविका नीला सोन्स यांच्या प्रयत्नात असल्याच्या राजकीय चर्चा सर्वत्र सुरु आहेत. शिवाय शिवसेना आणि काँग्रेस पक्ष राज्यातील आघाडीमुळे भाजपमधील काही नगरसेवकांना हाताला घेऊन आपला महापौर विराजमान करतील का प्रश्न निर्माण झाला आहे.

# गावठी बंदुका बनवून विकाणाऱ्यांना पोलिसांनी केले अटक

**नवी मुंबई –** अवैधरित्या गावठी बनावटीच्या बंदुका तयार करून त्यांची विक्री करणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाने अटक केली आहे. परशुराम राघव पिरकड (४०) आणि दत्ताराम गोविंद पंडित (५५) अशी या दोघांची नावे असून त्यांच्याकडून गावठी बनावटीच्या बारा बोअरच्या १० बंदुका, २ काडतुसे, ८ अर्धवट बंदुका व बंदुका बनविण्यासाठी लागणारे साहित्य तसेच, मोबाइल फोन व एक दुचाकी जफ्त केल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त प्रवीणकुमार पाटील यांनी दिली.



पनवेलमधील जुन्या मुंबई-पुणे महामार्गलगत दानफाटा येथे दोन व्यक्ती देशी बनावटीच्या बंदुकांची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेतील पोलिस हवालदार सतीश सरफरे यांना मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक एन. बी. कोल्हटकर व त्यांच्या पथकाने सापळा लावून पिरकड आणि पंडित या दोघांना ताब्यात घेतले. त्यांनी युट्यूबवरील व्हिडीओ पाहून गावातील शेतामध्ये बंदुका तयार केल्याची कबुली दिली.

त्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडून बंदूक बनविण्यासाठी लागणारे स्टिलचे पाइप, लाकडी बट, ड्रिल मशिन, ग्राइंडर मशिन, वेल्डिंग मशिन, लोखंडी पट्टा आदी साहित्य जफ्त केले. त्यानंतर या दोघांविरोधात पनवेल तालुका पोलिस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आल्याचे पोलिस उपायुक्त प्रवीणकुमार पाटील यांनी सांगितले. न्यायालयाने या आरोपींना २४ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

# भिवंडी नारपोली पोलिसांची मोठी कारवाई

## २१ लाख ७५ हजार किंमतीचा रसायनांचा साठा जप्त

**भिवंडी :** भिवंडीत बेकायदा रासायमिक गोदामांवर कारवाई करण्याचे निर्देश पर्यावरणमंत्र्यांनी देऊनही भिवंडी महसूल विभागाकडून या आदेशाला केराची टोपली दाखवली गेली आहे. बेकायदा रसायनांची साठवणूक करत असल्याचे प्रकार भिवंडीत वाढले आहेत. वळगाव येथील गोदामावर मंगळवारी नारपोली पोलिसांनी छापा घालून २१ लाख ७४ हजार ५४० रु पयांचे विनापरवाना २२३ ड्रम जप्त केले. या प्रकरणी गोदाम मालकासह गोदाम व्यवस्थापकाविरोधात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



केवळ थातूरमातूर कारवाया करून या माफियांना महसूल विभाग पाठीशी घालत असल्याचे चित्र भिवंडीत समोर येत आहे. या बेकायदा रासायनिक गोदामांना आगी लागल्याच्या घटना राजरोस घडत असतानाही महसूल विभाग व पोलीस प्रशासनाने झोपेचे सोंग घेतले आहे.

प्रकाश मोहिते (३९) असे गोदाम व्यवस्थापकाचे नाव असून अरु ण उर्फतानाजी शंकर पाटील असे गोदाम मालकाचे नाव आहे. त्यांनी वळगाव येथील भामरे कम्पाउंड येथे बेकायदा रसायनांचे २१ लाख ७४ हजार ५४० रु पयांचे विनापरवाना २२३ ड्रम ठेवले होते. ही माहिती नारपोली पोलिसांना मिळताच त्यांनी या गोदामावर छापा घालून विनापरवाना रसायनांचा साठा जप्त केला. गोदाम मालक व व्यवस्थापकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपस नारपोली पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक पुष्पराज सुर्वे करीत आहेत.

### यंत्रणांचे होत आहे दुर्लक्ष

च्भिवंडीत रसायनांच्या गोदामांना आगी लागून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याच्या घटना नेहमीच घडतात. त्यामुळे येथील गोदामांवर कारवाई करण्याचे आदेश पर्यावरण मंत्रालयाने दिले असूनही भिवंडीत मोठ्या प्रमाणात बेकायदा रसायनांची साठवणूक होत आहे.

# आरक्षित जागेवर भूमाफियांचा कब्जा

**विरार :** कचराभूमीसाठी आरक्षित जमीन भूमाफियांनी काबीज केल्याचा प्रकार वसईत समोर आला आहे. या जमिनीवर आता बेकायदेशीररीत्या चाळी उभारल्या जात आहेत. त्यामुळे आधीच शहरात कचराभूमीच्या जागेची टंचाई भासत असताना आरक्षित जागेवर असे प्रकार सुरु असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

वसई पूर्वेच्या राजिवली भागात सर्व्हे क्रमांक ११५ ची जमीन कचरा भूमीसाठी आरक्षित आहे. पालिकेने अद्याप ही जागा कचराभूमीसाठी तयार केलेली नाही. मात्र हा भूखंड आता भूमाफियांनी आपल्या कब्जात घेतलेला दिसतो. या जमिनीवर बिल्डरांनी माती टाकून चाळ बांधण्याचे काम हाती घेतले आहे. महापालिकेकडे वसईच्या गोखीवरे येथे एकच कचराभूमी आहे. ती जागाही अपुरी पडत असल्याने पालिकेला टंचाई भेडसावत आहे.

# जिल्ह्यातील १६ हजार१३१ शेतकऱ्यांच्या याद्या २८ फेब्रुवारी पर्यंत उपलब्ध होतील -जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर

**ठाणे –** महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील अस्नोली आणि मुरबाड तालुक्यातील धसई येथील थकबाकीदार शेतकरी सभासदांचे आधार प्रमाणिकरण करून या योजनेचा शुभारंभ आज करण्यात आला. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून जिल्ह्यातील १६ हजार १३१ पात्र शेतकऱ्यांच्या याद्या २८ फेब्रुवारी २०२० पर्यंत उपलब्ध होतील, असे जिल्हाधिकारी श्री राजेश नार्वेकर यांनी सांगितले.

महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत आज जिल्ह्यात शहापूर तालुक्यातील अस्नोली आणि मुरबाड तालुक्यातील धसई येथील आधार प्रमाणिकरणाचे कामाची पथदर्शी योजना हाती घेतली असून या दोन गावातील थकबाकीदार शेतकऱ्यांच्या याद्या पूर्ण झाल्या असून त्यांच्या आधार प्रमाणिकरणाच्या कामाचा शुभारंभ आज झाला. असनोली येथील १९२ तर धसई येथील ४९ पात्र शेतकऱ्यांची यादी पोर्टलवर असून त्यांचे आधार प्रमाणिकरण केले जाणार आहे. या याद्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्यांची त्या-त्या स्तरावर निर्गती केली जाणार आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीत कोणत्याही त्रुटी राहु नयेत, यासाठी प्रशासन सतर्क असून जिल्ह्यातील १६ हजार १३१ थकबाकीदार शेतकरी सभासदांची जवळपास ९६.६० कोटी रूपयांची कर्जमाफी होवून हे शेतकरी कर्जमुक्त होतील. या सर्व शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. जिल्हा उपनिबंधक शहाजी पाटील यांनी या योजनेची सविस्तर माहिती दिली. जिल्ह्यातील पात्र थकबाकीदार शेतकरी सभासदांच्या याद्या २८ फेब्रुवारी पर्यंत उपलब्ध केल्या जातील. या याद्या ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय, विकास सोसायटी तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संबंधित शाखेत लावल्या जातील, असेही ते म्हणाले.

### मी कर्जमुक्त होणार
### -शेतकरी वसंत पांडुरंग दिनकर

महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेमुळे माझे १ लाख रूपयांचे कर्ज माफ होवून मी कर्जमुक्त होणार असल्याचे समाधान अस्नोली येथील सोसायटीकडील १ लाख रूपयांच्या कर्जाची परतफेड करणे अशक्य झाले असताना शासनाच्या या कर्जमुक्ती योजनेमुळे मी कर्जमुक्त झालो हे माझ्यासाठी आणि माझ्या कुटुंबासाठी सर्वात आनंदाचा क्षण आहे.

अस्नोली येथील लक्ष्मण दिनकर यांनीही आपले ३५ हजार रूपयांचे थकीत कर्ज माफ होणार असल्याबद्दल समाधान व्यक्त करून शासनाचे आभार मानले. तसेच धसई येथील थकीत शेतकरी सभासद धनाजी घोलप यांचे धसई ग्रुप सहकारी सेवा सोसायटीचे १ लाख ८० हजार रूपयांचे कर्ज घेतले. खराब हवामान आणि मोठ्या प्रमाणावर झालेला पाऊस यामुळे मोठ्या प्रमाणावर पिकाचे नुकसान झाले त्यामुळे कर्ज परतफेड शक्य झाली नाही. आज शासनाच्या या योजनेमुळे मी कर्जमुक्त झालो आहे. हे सरकार शेतकऱ्यांचे सरकार आहे. थकीत कर्ज माफ होणार असल्याचा खूप आनंद आहे. या सरकारचे मनापासून आभार.

श्रीमती हर्षला घोलप यांचे ५१ हजाराचे कर्ज माफ झाल्यामुळे त्या खुश आहेत. घरगुती अडचणीमुळे त्या पिक कर्ज फेडू शकत नव्हत्या. शासन आमच्या सारख्या गोर गरीब जनतेच्या पाठीशी आहे. हि कर्जमुक्ती करून आम्हा शेतकऱ्याना शासनाने न्याय दिला आहे.

# काँग्रेस नगरसेवकांना फोडण्यासाठी आमिष व त्रास देणाऱ्या भाजपा नगरसेवका विरोधात पोलीसात तक्रार

**मीरारोड - मीरा भाईदर महापालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठी २६ फेब्रुवारीला होणाराया निवडणुकीसाठी भाजपाचे नगरसेवक फुटण्याची धास्ती असल्याने भाजपा नगरसेवकांना गोव्याला हलवले असतानाच काँग्रेस नगरसेवकांना फोडण्याचा प्रयत्न करणाराया भाजपा नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील विरोधात नया नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.**



महापालिकेत भाजपाचे ६१, शिवसेना २२ व काँग्रेस आघाडीचे १२ नगरसेवक आहेत. भाजपातील असंतोषा मुळे नगरसेवक फुटण्याच्या धास्तीने भाजपा नगरसेवकांना गोव्याच्या द ललित या पंचतारांकीत हॉटेल मध्ये ठेवण्यात आले आहे. शिवसेना व काँग्रेस महाविकास आघाडीचे ३४ नगरसेवक असुन भाजपा कडे स्पष्ट बहुमत असुनही त्यांना नगरसेवक फुटण्याची धास्ती आहे. त्यातच आमदार गीता जैन व समर्थक नगरसेवकांनी माजी आमदार नरेंद्र मेहतांच्या विरोधात आघाडी उघडल्यास भाजपाला फटका बसण्याची चिन्हे आहेत.

धास्तावलेल्या भाजपा नेतृत्वाने आता काँग्रेस आघाडीचे नगरसेवक फोडण्यासाठी हालचाली सुरु केल्या आहेत. त्यातुनच काँग्रेसच्या ज्येष्ठ नगरसेविका उमा सपार यांना फोडण्यासाठी भाजपाचे नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील यांनी सतत फोन करुन आमिष दाखवण्यासह मानसिक त्रास दिल्याची तक्रार काँग्रेसने नया नगर पोलीस ठाण्यात केली आहे. शुक्रवारी रात्री काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अंकुश मालुसरे, कार्याध्यक्ष प्रमोद सामंत, नगरसेवक अनिल सावंत, राजीव मेहरा, माजी नगरसेवक शफिक खान, पदाधिकारी दिप काकडे आदींनी नया नगर पोलीस ठाण्यात ध्रुवकिशोर विरोधात तक्रार देऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

उमा सपार ह्या ज्येष्ठ नगरसेविका असुन त्या आजारी आहेत. त्यांना नुकतेच घरी आणले आहे. तसे असताना ध्रुवकिशोर हे सपार व त्यांच्या मुलास सतत फोन करुन भाजपाला साथ देण्यासाठी आमिष दाखवत आहेत. मानसिक त्रास देत आहेत. त्यामुळे ध्रुवकिशोर विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी काँग्रेसने केली आहे. नया नगर पोलीस ठाण्यातुन ध्रुवकिशोर ना फ ोन करुन पोलीस ठाण्यात हजर राहण्यास सांगीतले असता आपण २६ फेब्रुवारी रोजी शहरात येणार असल्याचे सांगीतल्याचे सुत्रांनी सांगीतले.

# बनावट कागदपत्रांच्या आधारे जमीन विक्री करणाऱ्या मुख्य आरोपीच्या मुसक्या आवळल्या

**श्रीगोंदा** – श्रीगोंदा तालुक्यातील शेतीचे बनावट खरेदीखत, दस्तावेज, गहाणखत बनावट कागदपत्रे या प्रकरणातील अनेक दिवसांपासून फरार असणारा मास्टर माइंड अन्सार मुनीर शेख याला श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दौलतराव जाधव व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा अहमदनगर यांनी संयुक्त कारवाई करून त्याला अखेर गजाआड केला. याबाबत सविस्तर वृत्त असे की महसूल विभाग व दुय्यय निबंधक कार्यालयातील कर्मचाऱ्यांना हाताशी धरून शेतीचे बनावट खरेदीखत, दस्तऐवज, गहाणखत, बनावट उतारे, फेरफार, आधारकार्ड व बनावट महिला, पुरुषांना खरेदीखत करण्यासाठी उभे करून बँका, पतसंस्था,जमीनधारकांना,अधिकाऱ्यांना व महसूल विभागाला कोट्यवधींचा गंडा घालणारा या बनावट प्रकरणातील मास्टर माइंड अन्सार मुनीर शेख



याला अखेर पोलिसांनी गजाआड केला. आरोपीला न्यायालयापुढे उभे केले असता त्याला २५ तारखेपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.

श्रीगोंदा तालुक्यात ज्या लोकांच्या जमीनी आहेत परंतु ते नोकरी, व्यवसायानिमित्त बाहेरगावी राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीला हा आपले भक्ष्य करत असे. अहमदनगर येथील राहणाऱ्या मीरा कृष्णा श्रीपाद या महिलेची श्रीगोंदा शहरातील ५ त ६ गुंठे जमीन बनावट कागदपत्रे व बनावट महिला उभी करून खरेदी केली. तसेच ठाणे (मुंब्रा) येथील पोलीस निरीक्षक यांची पत्नी मिना अशोक पासलकर यांचीही कोथुळ येथील शेतजमीनीची बनावट कागदपत्रांच्या आधारे खरेदी केली. तसेच मांडवगण येथील उस्मान इनामदार यांचे बनावट मृत्यूपत्र बनवून देवस्थान जमिनीची खोटी वारसनोंद करून जमीन लाटण्याचा प्रयत्न केला.

## ‘बायको देता का बायको..’

# सिनेमाच्या अभिनेता, दिग्दर्शकास बेदम मारहाण

**बीड** - ‘बायको देता का बायको!’ या मराठी सिनेमाचा अभिनेता, दिग्दर्शकावर अज्ञात तरुणांनी अचानक जीवघेणा हल्ला केला. दोघांना बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीत अभिनेता सुरेश ठाणगे व दिग्दर्शक धनंजय यमपुरे हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. बीड येथील आशा सिनेफ्लेक्सच्या आवारात शनिवारी सायंकाळी ६ वाजता ही घटना घडली. अभिनेत्री श्वेता कुलकर्णी हिने प्रसंगावधान राखल्याने ती थोडक्याच बचावली.



याबाबत मिळालेली माहिती अशी की, बीड येथील आशा सिनेफ्लेक्स ‘बायको देता का बायको!’ सिनेमाचा शो सुरू झाल्यानंतर प्रेक्षकांसोबत धम्माल करण्यासाठी सिनेमाचे अभिनेता, अभिनेत्री आणि दिग्दर्शक आले होते. या दरम्यान, सिनेमागृहाच्या आवारात अज्ञात तरुणांनी त्यांच्यावर अचानक जीवघेणा हल्ला केला. हल्ल्यामध्ये चित्रपट अभिनेते सुरेश ठाणगे व निर्माते धनंजय यमपुरे गंभीर जखमी झाले आहेत. यावेळी अभिनेत्री श्वेता कुलकर्णी हिने बचावासाठी तेथून बळ काढल्याने ती थोडक्यात बचावली. हल्लेखोरांनी आशा सिनेफ्लेक्सच्या आवारात फर्निचरची तोडफोडही केल्याची माहिती मिळाली आहे.

‘विवाह’ हा प्रत्येकाच्या आयुष्यातला महत्त्वाचा क्षण असतो. उपवर झालेल्या प्रत्येक तरुणाला आपलंही लवकर लग्न व्हावं असं वाटत असतं. आपल्याला सुंदर व सुशील बायको मिळावी आणि आपली जोडी चारचौघात उठून दिसावी, अशी प्रत्येकाची इच्छा असते. याच भावनेतून बायकोच्या शोधात निघालेल्या तरुणांची कथा सांगणारा ‘बायको देता का बायको’ या मराठी सिनेमाची थिम आहे.

# रिझर्व्ह बँक एकट्यानं महागाई नियंत्रणात आणू शकत नाही

## RBIच्या माजी गव्हर्नरांचा मोदी सरकारला दे धक्का

**नवी दिल्ली** – रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर सी. रंगराजन यांनी रिझर्व्ह बँक एकट्यानं महागाई नियंत्रणात आणू शकत नसल्याचं स्पष्ट केलं आहे. कारण पुरवठा मागणीसंदर्भात सरकारनं आवश्यक व्यवस्थापन करण्याची गरज आहे. ‘नवीन आर्थिक धोरणं आणि त्याचा अर्थ’ या शीर्षकाखालील एका पत्रकावरील चर्चासत्रादरम्यान त्यांनी महागाई रोखण्यासाठी आरबीआयच्या मर्यादा अधोरेखित केल्या आहेत.



केंद्र सरकारनं महागाई नियंत्रणात आणण्याचं एक लक्ष्य दिलेलं आहे, त्याची व्याप्ती वाढायला हवी. त्याच्या कालबद्ध कार्यक्रमासाठी एक वेळ मर्यादा असावी आणि ती फारच अल्प मुदतीची नसावी. महागाईला नियंत्रणात आणण्यासाठी आर्थिक धोरणांवर काम केलं पाहिजे. त्यासाठी पुरवठा व्यवस्थापन आवश्यक असून, त्याची जबाबदारी सरकारकडे असावी. ते म्हणाले, महागाई नियंत्रणात आणण्याचं लक्ष्य देशात स्वीकारले गेले असले तरी या कल्पनेने अनेक शंका आणि चिंता वाढवल्या आहेत. आरबीआय कायद्यात सुधारणा केल्यानंतर चलनवाढीचे लक्ष्य लक्षात घेऊन धोरणात्मक दर ठरविणारी आर्थिक धोरण समिती स्थापन करण्याची व्यवस्थाही करण्यात आली. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय समिती मतदानाच्या आधारे असे निर्णय घेत असते. महागाई नियंत्रणात आणण्यावर लक्ष्य केंद्रित करून वाढ आणि आर्थिक स्थिरतेसारख्या इतर मुद्द्यांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं आहे.

# सरपंच निवडीचा अध्यादेश राज्यपालांनी फेटाळला

**मुंबई : विधान परिषदेतील दोन रिक्त जागा भरण्याबाबत सरकारचा प्रस्ताव परत पाठवत सरकारला धक्का देणाऱ्या राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी सरपंच निवडीबाबतच्या अध्यादेशावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. त्यामुळे निवडून आलेल्या सदस्यांमधून सरपंचाची निवड करण्याचा महाविकास आघाडीचा निर्णय विधेयक मंजूर झाल्यावरच अमलात येऊ शकेल.**



फडणवीस सरकारने थेट जनतेतून सरपंचाची निवड करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, सत्तांतरानंतर महाविकास आघाडी सरकारने फडणवीस सरकारचा निर्णय रद्द करीत सरपंचाची निवडही पूर्वीप्रमाणे ग्रामपंचायत सदस्यांमधूनच करण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी घेतला असून, त्याबाबचा अध्यादेश काढण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. त्यानुसार ग्रामविकास विभागाने अध्यादेश काढण्याबाबत केलेली विनंती राज्यपालांनी फेटाळून लावल्याचे सूत्रांनी सांगितले. अधिवेशनात याबाबतचे विधेयक मांडा, असे सांगून राज्यपालांनी अध्यादेशावर स्वाक्षरी करण्यास नकार दिल्याचे समजते. याबाबत ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांच्याशी संपर्क साधला असता, सोमवारपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबतचे विधेयक मांडण्याची सूचना राज्यपालांनी केली आहे.

# चलो अयोध्या; उद्धव ठाकरे ७ मार्च रोजी घेणार ‘श्रीराम दर्शन’

**मुंबई:** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे पुन्हा एकदा अयोध्येला जाणार आहेत. येत्या ७ मार्च रोजी उद्धव ठाकरे शिवसैनिकांसोबत अयोध्येला जाणार असून प्रभू रामचंद्राचं दर्शन घेणार आहेत, अशी माहिती शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी आज ट्विटरद्वारे दिली.

शिवसेना खासदार संजय राऊत यांनी पुन्हा ट्विट करत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अयोध्या दौऱ्याची सविस्तर माहिती दिली आहे. येत्या ७ मार्च रोजी उद्धव ठाकरे असंख्य शिवसैनिकांसह अयोध्येला जाणार आहेत. ७ मार्च रोजी अयोध्येत दुपारी श्रीरामाचे दर्शन घेतील. त्यानंतर संध्याकाळी शरयू नदीच्या तीरावर महाआरती करतील. त्यामुळे या ऐतिहासिक सोहळ्यात सामील व्हा, असं आवाहनही राऊत यांनी केलं आहे. कालच मुख्यमंत्री ठाकरे आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी आणि काँग्रेसच्या हंगामी अध्यक्षा सोनिया गांधी यांची भेट घेतली होती. त्यानंतर आज राऊत यांनी लगेचच ठाकरे यांच्या अयोध्या दौऱ्याचं ट्विट करून भाजपला धक्का दिला आहे. त्यामुळे ठाकरे यांच्या अयोध्या दौऱ्याकडे सर्वांचंच लक्ष लागलं आहे.

# 'हा तर मुंबईकरांना आणि मराठी माणसाला मुंबईच्या बाहेर काढण्याचा डाव...'

**मुंबई - मुंबई महानगरपालिकेचा मुंबईकरांना आणि मराठी माणसाला मुंबईच्या बाहेर काढण्याचा डाव आहे असा थेट आरोप शिवसेना पुरस्कृत मुंबईच्या नगरसेवकानं केला आहे. किरण लांडगे असं या नगरसेवकाचं नाव आहे. तसंच सर्वपक्षीय नगरसेवकांनीही याबद्दल आक्षेप घेतला आहे.**

***काय म्हणाले सर्वपक्षीय नगरसेवकः***

इथल्या झोपड्या १९७२ मध्ये वसल्या असताना प्रशासन कोणत्या नियमानुसार १९६४ चे पुरावे मागत आहे. प्रशासनाचा मुंबईतून मराठी माणूस हद्दपार करण्याचा डाव प्रशासनाचा आहे. तसंच यात विकासकांनी पालिका अधिकाऱ्यांसोबत मिळून हा डाव रचला आहे, असं नगरसेवसक किरण लांडगे यांनी म्हंटल आहे.



‘पालिकेचा कारभार म्हणजे आंधळा दळतय आणि कुत्र पीठ खातेय असा आहे, प्रत्येक विभागात असे अनुभव येतात जीव्हीकेला हे अधिकार दिले कोणी?,प्रशासनानं यावर नियंत्रण ठेवावं.’ असं भाजपचे नगरसेवक अभिजीत सामंत यांनी म्हंटलं आहे. ‘प्रकल्प बाधितांना १९६४ पुरावे कसले मागता. जे नियम आहेत त्यानुसार प्रकल्पबाधितांचे प्रश्न प्रशासनाने सोडवा.’ अशी मागणी शवसेनेचे राजू पेडणेकर यांनी केली आहे. तसंच काँग्रेसचे नगरसेवक अश्रफ आझमी यांनीसुद्धा पालिकेच्या निर्णयावर ताशेरे ओढले आहेत.

### काय आहे प्रकरण

विमानतळाच्या बाजूचा परिसर फनेल झोनमध्ये येतो. या ठिकाणी विमानांना ये-जा करता यावी म्हणून उंच इमारती बांधण्यासाठी मनाई आहे. अशाच फनेल झोनमध्ये येणाऱ्या कुर्ला आणि घाटकोपरमधल्या तब्बल १७३ झोपड्यांना मुंबई महानगरपालिकेनं नोटीस बजावल्या आहेत. या झोपडीधारकांना पुनर्वसनाची कोणतीही हमी न देताच नोटीस बजावण्यात आल्यामुळे सामान्य मुंबईकरांना मुंबई बाहेर फेकण्याचा डाव पालिकेचा आहे, असा गंभीर आरोप शिवसेना पुरस्कृत नगरसेवक किरण लांडगे यांनी सुधार समितीत केलाय. २००० पर्यंतच्या झोपड्यांना शासनानं संरक्षण दिले आहे.

# इंदोरीकरांच्या समर्थनार्थ अकोले तालुक्यात कडकडीत बंद

**अकोले** - राज्यातील प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज इंदोरीकर यांच्या समर्थनार्थ रविवारी अकोले तालुक्यात भजन-कीर्तनासह रस्त्यावर मोर्चा काढत कडकडीत बंद पाळण्यात आला. बंदमध्ये गावागावातून हजारो ग्रामस्थ, वारकरी, तरूण, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. इंदोरीकर महाराजांच्या समर्थनार्थ त्याचे मूळगाव इंदोरी ते अकोले अशी रॅली नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी काढली होती. तृप्ती देसाई यांनी महाराजांची जाहीर माफी मागावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.



इंदोरीकर महाराजांनी केलेल्या वक्तव्याचा भूमाता ब्रिगेडच्या कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी निषेध केला होता. यावेळी इंदोरीकर महाराजांना काळे फासण्याचा इशारा देसाई यांनी दिला होता. या पार्श्वभूमीवर देसाई यांना अकोले तालुक्यात पाय ठेवू देणार नाही, असा निर्धार करीत बंद पाळला. अकोले तालुक्यातील १०० हून अधिक ग्रामपंचायतींनी इंदोरीकर महाराजांच्या समर्थनार्थ ठराव केला. अकोले येथे बाजार तळावर सकाळी ११ वाजता निषेध सभा झाली.

निवृत्ती महाराजांच्या नादी लागू नको. ही अकोलेची माती आहे, असा इशारा सामाजिक कार्यकर्त्या इंदुमती वाकचौरे यांनी यावेळी दिला. अकोल्यातील सर्व महिलांनामध्ये मला आज स्मिता अष्टेकर दिसतात. या तालुक्यातील सर्व महिला वाघिणी आहेत, असे अष्टेकर म्हणाल्या. यावेळी उपस्थित महाराजांच्या समर्थकांनी भूमाता ब्रिगेडच्या प्रमुख तृप्ती देसाई यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली.

# राज्यात थंडी पुन्हा अवतरणार?



**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या मुंबईकरांना पुन्हा एकदा पहाटेची थंडी अनुभवायला मिळणार आहे.

उत्तरेकडे पडणारा पाऊस आणि बर्फवृष्टीमुळे पुढील दोन ते तीन दिवस मुंबईसह उत्तर महाराष्ट्रात किमान तापमानात घट होण्याचा अंदाज वेधशाळेने व्यक्त केला आहे. फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात पुन्हा उकाडा परतणार असल्याचेही हवामान खात्याने सांगितले आहे.

मुंबईत कमाल तापमानाचा पारा मागील काही दिवसांत ३५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. वाढलेल्या तापमानामुळे घामाघूम झालेल्या मुंबईकरांना पुढील दोन ते तीन दिवस सकाळच्या गुलाबी थंडीचा आनंद घेता येईल. उत्तरेकडील राज्यांमध्ये बर्फवृष्टी आणि पाऊस पडत आहे. उत्तरेकडून येणारे थंड वारे मुंबई आणि उत्तर महाराष्ट्राच्या दिशेने येत आहेत. त्यामुळे पहाटेच्या तापमानात घट होईल.

सध्या तापमान २०-२१ अंश सेल्सिअसपर्यंत आहे. किमान तापमानात घट होण्याची शक्यता असून त्याचबरोबर किंचित प्रमाणात कमाल तापमानामध्येही घट होईल, असे प्रादेशिक हवामान विभागाचे उपमहासंचालक कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले.

# सर्व ज्येष्ठ नागरिकांचे अभिनंदन



**विमान वाहतूक मंत्रालयाने मोदींना पुढे आणले जाणारे हवाई भाडे पार केले.**

**भारतीय राष्ट्रीयत्वाचे सर्व ज्येष्ठ नागरिक आणि ६०० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कायमस्वरूपी भारतात वास्तव्यास असलेल्या भारतीयांना एअर इंडियाच्या फ्लाइट तिकिटांची किंमत भारतीय प्रवासासाठी अर्ध्या किंमतीवर मिळते.**

**कृपया आपल्या कुटुंबातील आणि मित्रांमधील ज्येष्ठ नागरिकांना माहिती द्या.**

**http://www.airindia.in/senior-citizen-concession.htm**

JET TECHNO SERVICES PVT LTD.
Email :jettechnoservices@gmail.com

Senior Citizen Social Rights Foundation
सिनिअर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशन
Email : scsocialrightsfoundation@gmail.com • NITY AAYOG UNIQUE ID : MH/2019/0224064

R.N.I.no. MAHAR/2014/57121
मानवाधिकार बातमी
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

Annapurna Caterers
Udyog Aadhaar Number : MH33A0133630

R.N.I.no.MAHAR/2014/55402
महानगर समाचार
आपले स्वातंत्र आपले विचार
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

अखिल भारतीय मानवाधिकार युनियन
संस्थापक
दिपक मोरेश्वर नाईक
9594418181 / 9594047474

SOCIAL RIGHTS FOUNDATION
(सोशल राईटस् फाऊंडेशन)
Email : socialrightsfoundation2015@gmail.com • NITY AAYOG UNIQUE ID : MH/2019/0230947

पोलिस बातमी पत्र

आश्रय ट्रस्ट
सामाजिक • शैक्षणिक • सांस्कृतिक

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)